

कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।





शिक्षणमहर्षी कै.डॉ.ग.श्री. खैर तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार


Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine October 2017 - Pages - 44

संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे     कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

* पुणे * वर्ष ६८ वे * अंक १२ * **ऑक्टोबर २०१७** * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




नियामक मंडळाचे उपाध्यक्ष व विधानसभा विरोधी पक्ष नेते मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संस्था भेट प्रसंगी डावीकडून संचालक श्री. रमेश कुलकर्णी, श्री. दिनेश मिसाळ, श्री. संजय गुंजाळ, प्रा. राजेंद्र कडुसकर, कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, श्री. अमोल जोशी व श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि मध्यभागी कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे

* {Z¶m‘H$ ‘S>i mM AÜ¶j {X. O. VWm ^mD$gmh~ { I bma ¶mMr IÕmObr g^m *



‘m. Zm‘Xma amYmH$îU {d I nmQrb H$. ^mD$gmh~ ¶mÀ¶m~Ôb Amnb {dMma ì¶³V H$aVmZm, SmdrH$S>Z
Ir. gO¶ ‘V (OmdB), àmMm¶ hU‘V ^mgb, H$m¶mÜ¶j Ir. Eg. E‘. {OJ, Ir. {MÌgZ { I bma,
Ir. AmZX nmQrb (OmdB), Ir. ¶m{JamO { I bma, H$m¶dmh àm. amOÐ H$m~ i , H$bg{Md Ir. gZrb aS>H$a



H$. ^mD$gmh I { I bma ¶mÀ¶m AZH$ AmR>dUr d Ë¶mÀ¶m {df¶r ‘m{hVr XVmZm SmdrH$S>Z
Á¶ð> gMmbH$ àmMm¶ hU‘V ^mgb, H$m¶mÜ¶j Ir. Eg. E‘. {OJ, H$m¶dmh àm. amOÐ H$m~ i ,
H$bg{Md Ir. g{Zb aS>H$a, gMmbH$ Ir. {XZe {‘gm i Am{U ^mD$gmh~mM OmdB Ir. gO¶ ‘V

# शुभदीपावली

संस्थेचे सर्व देणगीदार, हितचिंतक,
पालक, आजी व माजी विद्यार्थी आणि
सर्व शिक्षक व सेवक
यांना
दीपावली व नूतनवर्ष
सुख, समृद्धी व भरभराटीचे जावो
ही हार्दिक शुभेच्छा!

**पुणे विद्यार्थी गृह**
संचालक मंडळ

संपादकीय

# कामातून व्यक्तिमत्वाचा परिचय

समाजातील कोणत्याही क्षेत्राचा विकास हा त्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक घटकावर अवलंबून असतो. निस्वार्थी व प्रामाणिकपणे मनापासून कष्ट - सेवा करणाऱ्या क्षेत्राचा - संस्थांचा विकास हा इतरांपेक्षा अधिक झालेला पहावयास मिळतो.

अनेक जण आपल्या कामाकडे अथवा व्यवसायाकडे केवळ स्वार्थाच्या दृष्टीकोनातून पाहातात, हे जरी एका अर्थी चूक नसले तरी आपण करीत असलेले काम - व्यवसाय फक्त स्वार्थ, आपला फायदा - प्राप्ती या पुरता मर्यादित न ठेवता ही समाजाची गरज असून आपण प्रथम समाजाकरीता उपयुक्त होईल अशा पद्धतीने व विचाराने केले तर त्यामध्ये आपणास प्राप्ती बरोबरच मानसिक समाधान मिळेल व यातून आपला आत्मविकासही साधता येईल.

अलीकडे अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकासाठी त्यांच्या आवश्यकतेनुसार त्यांच्यासाठी ते करीत असलेल्या कामाबाबत अधिकाधिक सुधारणांसाठी अनेक विविध प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करतात. त्यांच्या मध्ये असलेल्या कला गुणांचा - गुणवत्तेचा अभ्यास करुन त्यांच्या कामामध्ये त्यांना अनेक प्रकारे नवीन संधी - जबाबदाऱ्या देऊन त्यांच्याकडून जास्तीत जास्त चांगले काम करुन घेण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक हे त्या क्षेत्रातील व्यवस्थापनाचेही कौशल्य आहे असेही म्हणता येईल.

प्रत्येकाने आपण करीत असलेले काम अथवा व्यवसाय पूर्वापार पद्धतीने न करता त्यात आत्मपरिक्षणाने, नाविन्यपूर्ण वेगवेगळ्या पद्धतीने स्वतःहून सुधारणा करुन वेळ, श्रम व आर्थिक याबाबत होणारा अपव्यय टाळण्याचा - तो कसा वाचविता येईल याबाबत असणारे ज्ञान मिळवून करण्याचा प्रयत्न केल्यास ते काम करणाऱ्यास अधिक सुकर होण्यास निश्चितच मदत होईल.

अनेक क्षेत्रात काम करताना काहीजण त्या कामात आपली सर्व शक्ती, युक्ती, बुद्धी, वेळ व कौशल्य पणाला लावून करतात व त्या कामावर न कळत आपला परिचय व आपली ओळख निर्माण करीत असतात. कामाच्या पूर्ततेवरून एखादे काम कोणी केले असेल याची ओळख पटते.

तुम्ही करीत असलेल्या कामावरून तुमच्या व्यक्तिमत्वाचाच परिचय होत असतो. त्यामुळे काम करताना कोणताही संकुचित विचार न करता प्रत्येक काम हे चांगल्या दर्जाचे व उत्कृष्ट असेच करा. सर्व प्रयत्नांनी हे साध्य केल्यास आपणास आपल्या कामातील अधिकारपदे आपोआपच मिळतील व समाज आपणाकडे एक आदर्श व्यक्तिमत्व या आदराने पाहिल.

जेवढे जास्त ज्ञान मिळवाल, शिकाल व ते प्रत्यक्ष कृतीत आणाल तेवढे तुमचे आयुष्य सुकर व समृद्ध होईल. समाधान लाभेल.

**कोजागिरी पौर्णिमा**
दि. ५.१०.२०१७

# श्रद्धांजली सभा दि. २७.९.२०१७
# कै. दि. ज. तथा भाऊसाहेब खिलारे

कै. दि. ज. तथा भाऊसाहेब खिलारे यांच्या प्रतिमेला संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते पुष्पहार घालण्यात आला.

सर्व प्रथम संस्थेचे ज्येष्ठ संचालक प्रा. हणमंत भोसले यांनी भाऊसाहेब खिलारे यांच्याबाबत आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी गरीबांच्या अडीअडचणीच्या काळात मदत केली. सन १९६१ च्या पुरांच्या काळात स्वतः जातीने लक्ष घालून परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. श्री. भाऊसाहेब हे कै. श्री. प. भ. कुलकर्णी व कै. श्री. विठ्ठलराव लिखिते यांना आपले राजकीय गुरु मानत होते असे सांगितले. त्यांनी गरवारे महाविद्यालय व दिनानाथ मंगेशकर रुग्णालयास जागा दिलेल्या आहेत.

श्री. दिनेश मिसाळ यांनी ज्यावेळेस श्री. भाऊसाहेब खिलारे हे मुंबई शाखा भेटीसाठी येत असत त्यावेळी त्यांचे भेटीचे नियोजन व समय सूचकता, त्यांचा वक्तशीरपणा हा प्रामुख्याने दिसत असे. असे मनोगत व्यक्त करुन आपली श्रद्धांजली अर्पण केली.

विद्यार्थी दशेत असल्यापासून कै. श्री. विठ्ठलराव लिखिते यांचेमुळे श्री. भाऊसाहेबांची ओळख झाली. ते माझी अगत्यपूर्वक चौकशी करायचे. माझे लग्नाला ते स्वतः आले होते. सन २०११ मध्ये नवीन कार्यकर्ते झाले. त्यांना भाऊसाहेबांनी मार्गदर्शन केले. अशा प्रकारे श्री. सुनिल रेडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रा. राजेंद्र कांबळे यांनी आपली श्रद्धांजली अर्पण करतांना संस्थेने केलेली बदलीबाबत त्यांनी निर्णय बदलणार नाही, प्रशासनात त्यांनी कधीही ढवळाढवळ केली नाही असे आवर्जून सांगितले.

श्री. सुभाष जिर्गे - फोन आला, भाऊसाहेब खिलारे यांचे निधन झाल्याची बातमी कळाली. यावर प्रथम विश्वास ठेवणे अवघड झाले. त्यांनी विविध संस्थांना जागा दिली, त्यांची दानशूर वृत्ती, कर्वेनगर विभागातून नगरसेवकपदी निवड, कर्वेरस्ता दुरुस्ती इ. आठवणींना उजाळा देत आपली श्रद्धांजली अर्पण केली.

श्री. संजय मते - (श्री. भाऊसाहेब खिलारे यांचे जावई) यांनी आपले मनोगत व्यक्त करताना श्री. भाऊसाहेब खिलारे यांच्या नवीन पैलुचे दर्शन घडविले. त्यांना फोटोग्राफीची आवड होती. असंख्य फोटो त्यांनी काढले आहेत. ते उत्कृष्ठ असे फोटोग्राफर व चित्रकारही होते असे सांगितले.

मा. राधाकृष्ण विखे-पाटील - श्री. भाऊसाहेब खिलारे यांचे निधनाने दुःख वाटले. सन १९७६ मध्ये गरवारे महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यावेळी त्यांचे करारी व्यक्तिमत्व, आदराने पहाण्याजोगे व्यक्तिमत्व, माणसांची व मायेची संपत्ती भाऊसाहेबांकडे होती. स्वतःला मोठेपणा द्यावा अशी भाऊसाहेबांची इच्छा नव्हती. कार्यकर्ता घडविण्याचे काम भाऊसाहेबांनी केले. त्यातून नवी पिढी घडविली. काँग्रेस पक्षामध्ये काम केले, पद घेतले नाही, पदाचा मोह नव्हता. अशी माणसे सध्या दुर्मिळ झाल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. बडेजावपणा केला नाही. संस्थेने भाऊसाहेब खिलारे यांच्या कार्याची पुस्तिका छापावी अशी विनंती करुन आपली श्रद्धांजली अर्पण केली.

दोन मिनिटे शांत उभे राहून सर्वांनी भाऊसाहेबांना श्रद्धांजली अर्पण केली. प्रार्थना झाल्यानंतर कार्यक्रमाची समाप्ती झाली.

***

# शिशुनिकेतन मराठी माध्यम पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे**

## नागपंचमी

दि. २७.७.२०१७ रोजी शाळेत नागपंचमी हा सण साजरा करण्यात आला. बालवाडीच्या वर्गात नागपंचमीची तयारी करण्यात आली. सर्व मुलांनी मातीपासून बनविलेले नाग एकत्र ठेवण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी नागाच्या प्रतिकृतीची पूजा करुन नागपंचमीचे महत्त्व सांगितले. सौ. श्रद्धा ताम्हणकर यांनी नागपंचमीवर आधारित गोष्ट व गाणी म्हटली. सर्व मुलींनी मंगळागौरीचे खेळ खेळले.

## राखीपौर्णिमा

दि. ७.८.२०१७ रोजी राखीपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. मुलींनी मुलांना औक्षण करुन राख्या बांधल्या.

मुलांनी घोटीव कागदापासून, डाळीपासून, टिकल्या, मण्यांपासून वेगवेगळ्या प्रकारच्या राख्या तयार करुन त्यांचे प्रदर्शन बालवाडीच्या वर्गात भरविण्यात आले होते. रक्षाबंधनाचे महत्त्व व गोष्ट मुलांना सांगण्यात आली.

## श्रावणी शुक्रवार हळदी कुंकू समारंभ

दि. ११.८.२०१७ रोजी शाळेत श्रावणी शुक्रवार हळदी कुंकू कार्यक्रम साजरा करण्यात आला. सर्व महिला पालकांना हळदी कुंकवासाठी बोलाविले होते.

## दहीहंडी

दि. २२.८.२०१७ रोजी शाळेत दहीहंडीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. बालवाडीची मुले कृष्णाच्या वेशात आली होती. शिक्षिका सौ. नूतन मोरे, सौ. नयन मुंगळे यांनी कृष्णाची गाणी म्हटली. इ. ३ री व इ. ४ थी च्या मुलांनी मनोरे रचून दहीहंडी फोडली.

## निरोप समारंभ

शाळेच्या शिक्षिका सौ. अश्विनी जगरवाल या ३४ वर्षांच्या सेवेनंतर दि. ३१.८.२०१७ रोजी नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्या. शाळेतर्फे गुरुवार दि. ३१.८.२०१७ रोजी विशेष समारंभाचा कार्यक्रम संस्थेच्या राम मंदिरामध्ये सकाळी घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या प्रार्थनेने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. पुष्पगुच्छ व भेटवस्तु देऊन सौ. अश्विनी जगरवाल यांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी सौ. जगरवाल यांच्याबद्दलच्या आठवणी सांगितल्या. विद्यार्थ्यांचे वतीने वैष्णवी माने, शिक्षकांचे तर्फे सौ. नूतन मोरे, सौ. ताम्हणकर, सौ. मुंगळे, श्री. सावंत यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. सौ. अश्विनी जगरवाल यांनी आपल्या भाषणामध्ये संस्थेविषयी, शाळेतील सहकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सौ. नूतन मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची झाली. ***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. टी. आर. गोराणे**

## शिक्षक दिन संपन्न

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही पुणे जिल्हा पालकमंत्री मा. ना. गिरीशजी बापट व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर बांधवांचा पेनसेट भेट देऊन शिक्षकदिन साजरा करण्यात आला. प्रभागाचे नगरसेवक मा. हेमंत रासने, कार्यकर्ते श्री. खडके, श्री. मेहेंदळे इ. आणि प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. श्री. रासने व श्री. खडके यांनी यावेळी गुरुजनांशी हितगुज केले. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. टी. आर. गोराणे यांनी भारतीय संस्कृतीमधील गुरुजनांचे स्थान, डॉ. राधाकृष्णन यांचे जीवन कार्य, स्त्री व शिक्षक यांचा सन्मान जेथे होतो तो समाज उन्नत होत जातो. आजची सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती आणि त्यामुळे शिक्षकांची वाढलेली

जबाबदारी याबाबत समर्पक विवेचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अरविंद तुर्वनकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन सौ. प्राजक्ता चोपडे यांनी केले.

**इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन**

पुणे येथील डी. वाय. पाटील या प्रख्यात शिक्षणसंस्थेतर्फे गुरुवार दि. १४.९.२०१७ रोजी विद्यालयामध्ये सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. इ. १२ वी नंतरचे विविध व्यावसायिक अभ्यासक्रम, तेथे प्रवेश मिळण्याच्या संधी, त्यानंतर पुढील व्यवसाय नोकरीच्या औद्योगिकरणाशी संबंधित संधी याबाबत दृकश्राव्यमाध्यमातून संबंधित शिक्षणसंस्थेचे प्रतिनिधी श्री. सचिन गाढे व श्री. काझी यांनी उत्तम मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. मल्लिनाथ वाघमोडे यांनी केले.

**प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त**

लायन्स क्लब ऑफ पुणे ३२३४ डी २ व पुणे विद्यार्थी गृह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षक सन्मान गौरव सोहळ्यामध्ये **प्राचार्य डॉ. टी. आर. गोराणे यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.** यावेळी त्यांनी चालू ठेवलेल्या शैक्षणिक उपक्रमांसह अंधश्रद्धा निर्मूलनाच्या भरीव कामांची माहिती देण्यात आली. संस्थेच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सभागृहामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कुलसचिव श्री. सुनील रेडेकर, सर्व संस्था पदाधिकारी, विद्यालयाचे सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक यांनी डॉ. टी. आर. गोराणे यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ***

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल जोशी** **मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

**स्वातंत्र्यदिन**

विद्यालयाच्या प्रांगणात ७१ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे श्री. सुदाम सुर्यवंशी, कार्यक्रमाचे अध्यक्ष, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी केले. श्री. सुदाम सुर्यवंशी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यांनतर इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले हस्तलिखित 'महाराष्ट्रातील किल्ले' या अंकाचे प्रकाशन श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले.

कमलेश्वर न्यास द्वारा डॉ. शं. पां. किंजवडेकर यांचेतर्फे नाशिक शाखेतील पाच गरीब, होतकरु, सदाचारी विद्यार्थ्यांना प्रत्येकी १५००/- ची शिष्यवृत्ती देण्यात आली. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे १) चि. विशाल रामदास सुर्यवंशी इ. ६ वी २) चि. धनंजय निवृत्ती गायकवाड इ. ७ वी ३) चि. रोशन सखाराम रकिबे इ. ७ वी ४) चि. प्रतिक प्रकाश अमृतकर इ. ८ वी ५) चि. किरण अरुण रकिबे इ. ८ वी

ध्वजारोहणानंतर मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. सौ. तेजश्री जोशी यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी केले. विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

केल्यानंतर वंदेमातरम या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**दहीहंडी**

दि. १६.८.२०१७ रोजी दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. शिक्षिका सुनंदा ठाकरे यांनी कृष्णजन्माविषयी माहिती सांगितली. त्यानंतर वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेनंतर इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडली आणि गोपाळकाला वाटण्यात आला.

विद्यालयामधील सेवानिवृत्त कर्मचारी श्री. उपकारे यांनी दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गोपाळकाला बनविण्यासाठी रु. ५००/- रोख देणगी दिली. विद्यालयातर्फे त्यांचे मनःपूर्वक आभार !

वेशभूषा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे.

**इ. ५ वी व ६ वी गट**

| क्रमांक | विद्यार्थ्यांचे नावे | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | चि. अमित राऊत | ५ वी |
| द्वितीय | चि. भास्कर साबळे | ६ वी |

**इ. ७ वी, ८ वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. शिवप्रसाद गौंड | ७ वी |
| द्वितीय | चि. प्रतिक अमृतकर | ८ वी |

**इ. ९ वी, १० वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | चि. अनिकेत मोरे | ९ वी |
| द्वितीय | चि. कार्तिक देशमुख | ९ वी |

**पालक शिक्षक सभा**

दि. २३.८.२०१७ रोजी पालक शिक्षक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेस मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री. सुदाम सुर्यवंशी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वीकारले. सर्वप्रथम संस्थेचे दिवंगत देणगीदार, हितचिंतक, सांस्कृतिक, सामजिक क्षेत्रातील मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मागील सभेचे इतिवृत्त सौ. तेजश्री जोशी यांनी वाचन केले. मान्यवरांच्या हस्ते सन २०१६ - १७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी मध्ये प्रथम आलेल्या तीन विद्यार्थ्यांना रोख रक्कम स्वरूपात बक्षीस देण्यात आले. श्री. तुकाराम मंडले यांनी शालेय शिस्त आणि परिक्षा पद्धती संदर्भात मौलिक सूचना केल्या. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी पाल्यांच्या चांगल्या - वाईट सवयी, आहार, अभ्यास, व्यायाम इ. विषयी मार्गदर्शन केले.

त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ च्या पालक शिक्षक कार्यकारिणीची निवड करण्यात आली. निवड झालेल्या कार्यकारिणी सदस्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी विविध शिष्यवृत्ती योजना, स्पर्धा परिक्षा याबाबत पालकांना मार्गदर्शन केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले. चहापानानंतर पालक - शिक्षक सभेची सांगता झाली.

**शिक्षकदिन**

दि. ४.६.२०१७ रोजी विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात संपन्न झाला. सर्व शिक्षकांचा गुलाबपुपष्प देऊन सत्कार केला.

शिक्षकदिनानिमित्त इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी अध्यापन केले. या विद्यार्थी शिक्षकांनी कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल त्यांचेही अध्यक्षांच्या शुभहस्ते गुलाबपुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.

विद्यालयातील शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. सुमित बावीस्कर इ. १० वी या विद्यार्थ्याने केले. चि. दादाराव धुमाळ इ. १० वी या विद्यार्थ्याने आभार मानले.

**श्री गणेशोत्सव**

दि. २५.८.२०१७ रोजी अतिशय जल्लोषात श्री गणेश स्थापना करण्यात आली. दि. ३.९.२०१७ रोजी

श्री गणपती अथर्वशीर्ष सहस्रावर्तन घेण्यात आले. शिक्षिका सौ. तेजश्री जोशी आणि लिपिक संध्या नाईक यांनी विद्यार्थ्यांना श्री गणपति अथर्वशीर्षाची संथा दिली. गणेशोत्सवामध्ये सुंदर हस्ताक्षर, गणेश गीत गायन, श्री गणेश रेखाटन अशा विविध सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. ***

# पंचवटी शाखा, नाशिक आश्रम वसतिगृह

**अमोल : श्री. अमोल म. जोशी**

### आश्रमीय विद्यार्थ्यांचे रक्तगट व रक्त तपासणी शिबीर संपन्न

दि. ५ ऑगस्ट २०१७ रोजी क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटर यांच्या कडून आश्रमीय विद्यार्थी व संस्थेतील कर्मचारी यांची रक्त गट व सी. बी. सी. ची तपासणी मोफत करण्यात आली.

कार्यक्रम प्रसंगी क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटरचे श्री. प्रफुल्ल सोनवणे (झोनल मॅनेजर), श्री. नारायण माने मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, श्री. मदनलाल भराटीया सेंटर इनचार्ज, श्री. दिलीप कांबळे व श्री. दिनेश गावित सिनियर टेक्निशियन हे उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सर्व विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक काळजी कशी घ्यावी? याची माहिती देण्यात आली. क्रस्ना डायग्नोस्टिक्स सेंटर यांच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ दिला.

उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापक श्री. डी. टी. निंबेकर यांनी केले. क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटरच्या पदाधिकाऱ्यांचे आभार संचालक श्री. अमोल जोशी यांनी मानले.

### संवेदना फाऊंडेशन तर्फे रु. ७२,०००/- ची देणगी प्राप्त

संवेदना फाऊंडेशन, नाशिक या संस्थेच्या वतीने प्रती वर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्या उपक्रमाचा एक भाग म्हणून स्वर अक्षर नृत्य गणेश हा कार्यक्रम दि. १७ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित करण्यात आला. प्रत्येक वर्षी सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना वस्तुरुप किंवा आर्थिक रूपाने या संस्थेकडून मदत केली जाते. या वर्षी आश्रमातील १६ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चासाठी रु. ७२,०००/- ची भरीव देणगी या संस्थेने दिलेली आहे. रक्कम रु. ७२,०००/- चा धनादेश दि. १७ ऑगस्ट २०१७ रोजी विश्वास लॉन्स, नाशिक येथे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

संवेदना फाऊंडेशनचे पदाधिकारी ॲड. अजय निकम, सर्वश्री गणेश भोरे, अविनाश बोडके, प्रशांत कदम, हर्षल मटकर यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

### रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न

दि. ७ ऑगस्ट २०१७ रोजी रक्षाबंधन कार्यक्रम संस्थेमध्ये आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात श्रीमती सुवर्णा चिवटे, कु. स्वप्नाली चिवटे, श्रीमती भावना चिखले, सौ. सुदर्शना चिखले, सौ. जयश्री चिखले व कु. आदिती चिखले, कु. अनामिका चिखले यांनी संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या तसेच विद्यार्थ्यांना प्रबोधनपर माहिती सांगितली. या भगिनींनी आश्रमीय विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. संस्थेच्या वतीने संचालक श्री. अमोल जोशी यांनी त्यांचे स्वागत केले व आभार मानले. ***



## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**

**विद्याभवन नं. २**
**मुख्याध्यापिका : सौ. उमा गोपालकृष्णन्**

### निसर्ग मंडळ : मखर स्पर्धेचे आयोजन

दि २१ ऑगस्ट २०१७ रोजी मखर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये इयत्ता ७वी व ८वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सहभागी सर्व विद्यार्थ्यांनी इको फ्रेंडली मखर प्रदर्शनामध्ये सादर केली होती. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या मखरांपैकी सर्वोत्तम पाच मखर निवडण्यात आले. ज्येष्ठ कला शिक्षक श्री. संदिप तावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी निसर्ग मंडळाच्या स्वयंसेवकांचे व शिक्षिका सौ. संगिता मुंढे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### निसर्ग मंडळ अहवाल : हसरा नाचरा श्रावण आला.

दि. २४.०८.२०१७ रोजी निसर्ग मंडळामार्फत श्रावण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवामध्ये इयत्ता ८वी च्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

शिक्षिका सौ. संगिता मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मुलींनी सांस्कृतिक नृत्ये, लोकनृत्य व फुगडी यासारखे प्रकार सादर केले. या प्रसंगी प्रीतीभोजनाचाही आस्वाद सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी घेतला. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व स्वयंसेवकांचा हातभार लागला.

**विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय**
**मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### गणेशोत्सव

सालाबादप्रमाणे याही वर्षी प्रशालेत दि. २५.८.२०१७ ते ३१.८.२०१७ या कालावधीमध्ये गणेशोत्सव मोठया थाटात व उत्साहात साजरा करण्यात आला.

दि. २५.८.२०१७ रोजी सकाळी लेझीमच्या साथीने वाजत-गाजत श्रींचे आगमन झाले. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते श्री गणेशाची प्रतिष्ठापना करुन आरती करण्यात आली. याप्रसंगी जेष्ठ संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे, कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. ३१.८.२०१७ रोजी सकाळी सहा. शिक्षिका सौ. हिरा जाधव, उपमुख्याध्यापिका सौ. सुरेखा लअुळकर व इंग्रजी माध्यमिक विभागाच्या सौ. पद्मिनी व्यंकटेश यांच्या मार्गदर्शनाखाली गणपती अथर्वशीर्षाचे २१ वेळा आवर्तन विद्यार्थी व शिक्षक यांच्या समवेत करण्यात आले. त्यानंतर ढोल लेझीमच्या साथीने श्रींची मिरवणूक काढून पवई येथे भावपूर्ण विसर्जन करण्यात आले.

### डॉ. अण्णासाहेब खैर पारितोषिक वितरण समारंभ

दि. ३ सप्टेंबर २०१७ रोजी प्रशालेच्या सेमीनार हॉलमध्ये डॉ. अण्णासाहेब खैर पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. अण्णासाहेब खैर यांची नात डॉ. मेधा भावे व डॉ. आनंद भावे यांच्या हस्ते इ. ५वी व ८वीचे शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी, १०वी व १२ वी चे गुणवंत विद्यार्थी तसेच उच्च शैक्षणिक पात्रता प्राप्त शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचे पाल्य तसेच शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन माजी मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मेहेंदळे यांनी केले.

### गीता पाठांतर व गीता वक्तृत्व स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ मुंबई विभागातर्फे १२ ऑगस्ट रोजी गीता पाठांतर स्पर्धा तर १९ ऑगस्ट रोजी गीता वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविली. त्यांची नावे पुढीलप्रमाणे

**गीता पाठांतर स्पर्धा (मराठी)**

**गट क्र ४ : ५वी - ६वी**

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | कु. अक्षता गणपत पुजारी | ६वीअ |
| द्वितीय | कु. आर्या चंद्रकांत पवार | ६वी क |

**गट क्र ५ : ७वी ते ९वी गट**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. अभय कमलाकर डेरे | ८वी क |
| द्वितीय | कु. सायली देविदास डेरे | ८वी क |
| तृतीय | कु. सूरज प्रदीप जाधव | ८ वी अ |

**गीता वक्तृत्व स्पर्धा**

**गट क्र. १**

| | | |
|---|---|---|
| द्वितीय | कु. प्रजोल रमेश आव्हाड | ६वी अ |
| तृतीय | कु. प्रज्वल सुदाम सांगळे | ७वी क |

**गट क्र. २**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. श्रावणी विजय सावंत | ८वी अ |

**विद्याभवन प्राथमिक इंग्रजी**
**मुख्याध्यापिका : सौ. शुभांगी जाधव**

**७१ वा स्वातंत्र्य दिन**

दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ७ वाजता कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. परागभाई शहा (बृहन्मुंबई महानगरपालिका नगरसेवक) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व ध्वजगीत सादर केले. पाहुण्यांचा परिचय वरिष्ठ शिक्षिका सौ. शोभा हरवंदे यांनी करुन दिला. ज्येष्ठ संचालक प्राचार्य के. एन. शिरकांडे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचा व इतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. प्राथमिक इंग्रजी व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे व समूहगीते सादर केली.

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी महामंडळातर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार माध्यमिक मराठी विभागाचे वरिष्ठ शिक्षक श्री. पांडुरंग मुळीक यांना प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापिका श्रीमती रश्मी जोशी यांच्या मातोश्री कै. पुष्पा श्रीपाद करंदीकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दिला जाणारा ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार मराठी विभागाच्या शिपाई श्रीमती मनिषा कदम व श्री. पोपट चव्हाण यांना देण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्रीफळ व रोख रक्कम देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी प्राथमिक मराठी विभागाचे नवनियुक्त मुख्याध्यापक म्हणून श्री. गणेश कणसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे अशी घोषणा केली व त्यांचे अभिनंदन केले.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना, उपस्थित पालक व शिक्षकांना अमूल्य मार्गदर्शन केले. नंतर इंग्रजी व मराठी पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्ये सादर केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दिपक निचित यांनी केले. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक व पालकांचे आभार मानले. प्राथमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी गायलेल्या वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**राष्ट्रीय स्तरावरील स्पेल बी परीक्षा**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये राज्य पातळीवर घेण्यात आलेल्या शब्दलेखन परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला.

या परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. श्रीनिवास मिलिंद पाटकर | २री | प्रथम |
| कु. याशिका मिलिंद पाटकर | २री | प्रथम |
| कु. श्रावणी अजित मोरडेकर | २री | आठवा |
| कु. तनिष्का संतोष साबळे | २री | नववा |
| कु. यश सचिन रसाळ | ३री | सातवा |

**लायन्स इंटरनॅशनल क्लब पुरस्कार**

दि. १० सप्टेंबर २०१७ रोजी इंग्रजी प्राथमिक विभागाच्या **सहाय्यक शिक्षिका श्रीमती सुजाता शेखर दिवेकर यांना बॉम्बे वेस्ट कोस्ट अपटाउन आणि लायन्स इंटरनॅशनल क्लब, जगदुशा हिल यांच्यातर्फे 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.** ✻✻✻

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

**शैक्षणिक सहल**

शनिवार दि. ९.९.२०१७ रोजी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी चाकण येथे पार्कसन पॅकेजिंग या कंपनीमध्ये शैक्षणिक सहल आयोजित केली होती. तेथे मनुष्यबळ विभागाच्या सौ. मुरगण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कंपनीमध्ये बॉक्स तयार करतात. सर्वप्रथम पेपरवर प्रिंट करुन त्याचे कार्टन तयार केले जाते. विद्यार्थ्यांनी सर्व मशिनची माहिती जाणून घेतली. प्रत्येक मशिनच्या ऑपरेटर्सनी मशिन कशी चालते ते समजावून सांगितले.

या शैक्षणिक सहलीसाठी श्री. सिद्धार्थ बावीस्कर आणि श्री. सागर बंडगर उपस्थित होते. या शैक्षणिक सहलीमधून विद्यार्थ्यांना मुद्रण क्षेत्रातील नवीन यंत्र, काम करण्याची पद्धत व नवीन गोष्टींबद्दल माहिती मिळाली.

**सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंटचे वर्कशॉप**

बुधवार ते शुक्रवार दि. १३.९.२०१७ ते १५.९.२०१७ रोजी सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट या विषयावर वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. श्री. सुमित शिखरे यांनी हे वर्कशॉप घेतले.

या वर्कशॉपमध्ये कम्युनिकेशन स्किल, प्रेझेंटेशन आणि डेमॉन्स्ट्रेशन स्किल वाढले. इंटरव्ह्यू साठी लागणारे सर्व मार्गदर्शन केले. श्री. सुमित शिखरे यांनी अत्यंत आनंदमय वातावरणामधे शैक्षणिक मार्गदर्शन केले.

वर्कशॉपच्या शेवटच्या दिवशी शीतल पुंगळीया या प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना एकाग्रता कशी ठेवायची यावर मार्गदर्शन केले. सदर सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंटच्या वर्कशॉपचे आयोजन प्र. प्राचार्य पी. व्ही. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. अक्षय रावेतकर यांनी केले. सदर वर्कशॉपचा उपयोग विद्यार्थ्यांना मुलाखतीकरिता व भविष्यकाळात नवीन गोष्टी समजून घेण्याकरिता होणार आहे. ✻✻✻

## कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर तिथीनुसार स्मृतिदिन अश्विन शुद्ध ६

संस्थेचे कुलगुरु कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर यांचा तिथीनुसार स्मृतिदिन दि. २६.९.२०१७ रोजी साजरा करण्यात आला. माजी विद्यार्थी प्रा. तु. आ. माने यांचे हस्ते दादांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रा. तु. आ. माने सर यांनी राहुरी विद्यापीठातून एम.टेक (ॲग्री) पदवी प्राप्त करुन त्याच विद्यापीठात प्राध्यापक म्हणून उत्कृष्ठ काम केले. ते ॲग्रीकल्चर टेक्नॉलॉजीचे पहिल्या बॅचचे विद्यार्थी होते. ते आठ वर्षे आश्रमीय विद्यार्थी होते.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य हणमंत भोसले यांनी केले. प्रमुख पाहुणे प्रा. तु. आ. माने यांनी दादांच्या आठवणींना उजाळा देऊन काही आठवणी आजच्या पिढीला कशा लाभदायक आहेत ते विशद केले.

प्रमुख पाहुण्यांचा सत्कार कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी पुष्पगुच्छ देऊन केला. ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमांची सांगता झाली. ✻✻✻

# अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**
**प्राचार्य : डॉ. योगेश नेरकर**

## डॉ. एम्. कटककर यांची सदिच्छा भेट

संस्थेचे देणगीदार डॉ. एम्. कटककर यांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे येथे विद्युत अभियांत्रिकी विभागामध्ये नवीन स्थापन होत असलेल्या 'डॉ. एम्. कटककर पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च सेंटर' यासाठी रु. ५ लाखांची भरीव देणगी दिलेली आहे. या रकमेचा विनियोग संशोधनासाठी आवश्यक ती उपकरणे, कॉम्प्युटर्स घेण्यासाठी करण्यात आला. या रिसर्च सेंटरसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात व त्यामध्ये समाजाला उपयुक्त व जगप्रसिद्ध संशोधन कार्य व्हावे अशी इच्छा डॉ. एम्. कटककर यांनी शुक्रवार दि. २२.९.२०१७ रोजी या रिसर्च सेंटरला प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर व्यक्त केली. अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी रु. ६ लाखांची वाढीव देणगी देण्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले.

देणगीदार डॉ. एम. कटककर यांचा पुष्पगुच्छ देऊन संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी सत्कार केला.

कुलसचिव व महाविद्यालयाचे संचालक श्री. सुनिल रेडेकर, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर व कृष्णाजी कुलकर्णी यांनी डॉ. एम्. कटककर यांचेशी वेळोवेळी संवाद साधून या संशोधन केंद्राच्या उभारणीसाठी ही देणगी मिळविण्यासाठी सतत प्रयत्न केले.

✻✻✻

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**
**प्र. प्राचार्या : सौ. नूतन बापट**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. उत्कर्षा केणी**

**अभिनंदनीय**

✻ **कु. सिद्धेश दायमा (इ ५वी अ) याने दि. २० ऑगस्ट २०१७ रोजी पुणे येथे आयोजित झालेल्या 'स्केटिंग' स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.**

✻ **कु. यश तापरे (इ. १०वी अ)** याने अहमदनगर जिल्ह्यात दि. १३ ऑगस्ट २०१७ रोजी 'यश बॉडिलाईन' जिमतर्फे आयोजित केलेल्या **'यश बॉडिलाईन श्री' स्पर्धेत ६५ किलो वजन गटात भाग घेतला व त्याने पाचवा क्रमांक पटकावला.**

✻ **कुमार चिराग कदम (इ. ८वी अ)** याने माहे ऑगस्ट २०१७ मध्ये पुणे येथे झालेल्या **'महाराष्ट्र लेव्हल फुल कॉन्टॅक्ट कराटे' चॅम्पियनशिपमध्ये भाग घेतला व त्याला कांस्य पदक व चषक मिळाला.**

✻ **कुमार आदित्य भरगुडे (इ. ९वी अ)** याने दि. १० सप्टेंबर २०१७ रोजी आर.सी.एम. गुजराथी स्कूल, सोमवार पेठ, पुणे येथे भरलेल्या इन्व्हिटेशनल स्टेट लेव्हल स्पर्धेत भाग घेऊन **Kumite (fight) मध्ये सुवर्णपदक व ट्रॉफी मिळविली. काता चॅम्पियनशिप स्पर्धेत कांस्य पदक मिळविले. राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणाऱ्या स्पर्धांसाठी त्याची निवड करण्यात आली आहे.**

✻ धायरी, पुणे येथे दि. १० सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित झालेल्या **इन्व्हिटेशनल स्टेट कराटे चॅम्पियनशिप स्पर्धांत कु. आदिती कुलकर्णी (इ. ९वी अ) हिने भाग घेऊन Kumite (fight)**

**स्पर्धेत सुवर्णपदक तर काता स्पर्धेत रजतपदक मिळविले.**

✲ मुंबई येथे दि. १० सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत **कु. मधुरा नाईक (इ. ८वी इ) हिने काता स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले.** दि. १३ सप्टेंबर २०१७ रोजी खराडी, पुणे येथे आयोजित केलेल्या आंतरशालेय स्पर्धेत तिने तृतीय क्रमांक मिळवला.

✲ कु. समृद्धी मेदनकर (इ. ९वी ब) या विद्यार्थिनीने मुंबई येथे दि. १० सप्टेंबर २०१७ रोजी WFSKO ने आयोजित केलेल्या '२८व्या नॅशनल वर्ल्ड फुनाकोशी शोटोकॉन कराटे चॅम्पियनशिप' स्पर्धेत **रजतपदक** पटकावले.

✲ कु. पृथा आचरेकर (इ. ६वी अ) या विद्यार्थिनीने टेबल टेनिसच्या 'डिस्ट्रिक्ट रँकिंग टूर्नमेंट्स २०१७' मध्ये भाग घेतला. ती ३ सेमिफायनल्स व २ क्वार्टर फायनल्सपर्यंत पोहोचली आहे. पुणे जिल्ह्यात तिचा चतुर्थ क्रमांक आला असून नांदेड व नागपूर येथे भरलेल्या स्टेट रँकिंग स्पर्धांत तिने भाग घेतला. तिची सर्वात्कृष्ट १० मध्ये गणना झाली असून महाराष्ट्रात तिचा १०वा क्रमांक आला आहे. माहे ऑगस्ट २०१७ मध्ये इंदूर येथे भरलेल्या 'सेंट्रल झोन नॅशनल रँकिंग टूर्नमेंट' मध्ये तिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. सप्टेंबर २०१७ मध्ये धारवाड येथे भरलेल्या 'नॅशनल रँकिंग टूर्नमेंट (साऊथ झोन)' या स्पर्धांत ती यशस्वी ठरली आहे.

✲ 'लायन्स क्लब ऑफ पुणे' यांनी दि. १३ सप्टेंबर २०१७ रोजी '४०वी आंतरशालेय वक्तृत्व' स्पर्धेचे आयोजन उद्यान प्रसाद मंगल कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे येथे केले होते. या स्पर्धेत विविध शाळांतून एकूण ६६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेसाठी 'माझा वाढदिवस', 'माझा आवडता खाऊ' व 'नको ते पाळणाघर' असे विषय देण्यात आले होते. प्राथमिक विभागातून एकूण ३ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. कु. राघवेन्द्र कुलकर्णी (इ. ३री क) व कु. गार्गी काणे (इ. ३री क) या दोघांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. या विद्यार्थ्यांना प्राथमिक विभागातील शिक्षिका सौ. क्षमा हर्डीकर, सौ. श्रेया सावंत व सौ. कल्याणी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

✲ कुमार प्रवीण संघवे (इ. ८वी ड) याने दि. १५ सप्टेंबर २०१७ रोजी जिल्हा परिषद १७ वर्षे वयोगटाखालील कराटे स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

✲ दि. १८ सप्टेंबर २०१७ रोजी शिवाजी मंदिर, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा परिषद आंतरशालेय ज्युडो स्पर्धांत कु. ओंकार तिलया (इ. ९वी ड) याने ५५ किलो वजनाखालील गटात द्वितीय क्रमांक मिळविला तर कुमार पृथ्वीराज मुजुमले (इ. १०वी अ) याने ५० किलो वजनाखालील गटात तृतीय क्रमांक पटकावून १३ सेकंदात स्पर्धा जिंकून विक्रम प्रस्थापित केला.

✲ कु. कश्मीरा देवकर (इ. ८वी इ) हिने 'नॅशनल लेव्हल कराटे चॅम्पियनशिप' स्पर्धेत **सुवर्णपदक व कांस्य पदक मिळविले.**

✲ कु. सृष्टी घोलप (इ. ५वी ब) हिने सप्टेंबर २०१७ मध्ये मुंबई येथे झालेल्या 'नॅशनल ऑलिम्पिक कराटे' स्पर्धेत रजतपदक मिळविले.

**शिक्षक विभाग**



सौ. स्वाती निकम

✲ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षिका **सौ. स्वाती निकम** यांनी दि. ४ सप्टेंबर २०१७ रोजी **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी.** प्राप्त केली. त्यांच्या संशोधनाचा 'Structural and Photo Physical Properties of modified Bismuth vanadate nanostructures' हा विषय होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातल्या सौ. सत्यवती जोशी यांनी त्यांना मार्गदर्शन केले. **संस्थेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन.**

**⁕ शिक्षक दिन - गौरव सोहळा - सौ. उत्कर्षा केणी यांना मानपत्र -** द इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ लायन्स क्लब यांनी लायन्स शताब्दी महोत्सवानिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून दि. ९ सप्टेंबर २०१७ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात 'शिक्षक दिन-गौरव सोहळा' आयोजित केला होता. प्र. मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा प्रकाश केणी यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रमुख पाहुणे श्री. हणमंतराव गायकवाड, मा. लायन रमेश शहा प्रथम उपप्रांतपाल, मा. लायन ओमप्रकाश पेठे द्वितीय उपप्रांतपाल यांच्या शुभहस्ते मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

**⁕ सौ. अनुपमा गुजराथी यांना 'नेशन बिल्डर पुरस्कार'** - रोटरी तर्फे देण्यात येणारा 'नेशन बिल्डर पुरस्कार' यावर्षी पर्यवेक्षिका सौ. अनुपमा गुजराथी यांना जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार रोटरी क्लब पुणे कात्रज यांनी दि. ९ सप्टेंबर २०१७ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या एम्.बी.ए. महाविद्यालयाच्या सभागृहात शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्याक्रमात सौ. अनुपमा गुजराथी यांना प्रदान केला. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून रोटेरियन दीपा गाडगीळ (रोटरी प्रांतपाल यांच्या सुविद्य पत्नी) उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाला रोटरी क्लब नॉर्थचे अध्यक्ष रोटेरियन श्री. मोडक हेही उपस्थित होते.

**⁕ मुक्तांगण शाळेच्या प्राचार्या आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित -** रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाऊन यांच्यातर्फे दि. १३ सप्टेंबर २०१७ रोजी सेवासदन इंग्लिश मिडियम स्कूल, एरंडवणे, पुणे येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट यांना नामवंत शिक्षणतज्ज्ञ डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते २०१७-१८ च्या 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**⁕ प्रभारी प्राचार्या सौ. नूतन बापट यांना NASA स भेट देण्याची अपूर्व संधी**

**प्र. प्राचार्या सौ. नूतन बापट यांची 'पुणेकर एज्युकेशनल इनिशिएटिव्हज्' व सकाळ मधुरांगणने शिक्षण प्रसाराच्या उद्देशाने मोफत NASA टूरसाठी निवड केली आहे.** ही टूर मे २०१८ मध्ये आयोजित करण्यात आली आहे.

सौ. नूतन बापट मुक्तांगण इंग्लिश स्कूल येथे ३४ वर्षे कार्यरत आहेत. ३० वर्षे त्यांनी उच्च माध्यमिक विभागात अध्यापन केले असून १९ वर्षे उच्च माध्यमिक विभागाच्या विभाग प्रमुख म्हणून त्या कार्यरत होत्या. जून २०१५ पासून माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या प्राचार्या या पदाचा कार्यभार त्या यशस्वीरित्या सांभाळत आहेत. इ. ११वी साठीच्या केंद्रिय प्रवेश समितीच्या सभासद म्हणून त्यांनी काम केले आहे. तसेच या वर्षी त्या पर्वती विभागाच्या प्रमुख म्हणूनही काम पाहत आहेत. महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या इ. १२वी च्या परीक्षेसाठी त्यांनी डेप्युटी कंडक्टर म्हणून तसेच एच.एस.सी. च्या सेंट्रल व्हॅल्युएशन सेंटरसाठी कस्टोडियन म्हणूनही काम केले आहे.

**इंटरहाऊस क्विझ कॉम्पिटिशन**

दि. १४ ऑगस्ट २०१७ रोजी 'इंटरहाऊस क्विझ कॉम्पिटिशन' संपन्न झाली. त्यात **बोस हाऊसला प्रथम क्रमांक** मिळाला. तर **टिळक हाऊसने द्वितीय क्रमांक** पटकावला. या दोन गटांतील यशस्वी स्पर्धकांची नावे खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| **बोस हाऊस** | कु. ध्रुव राजवाडे | इ. १०वी इ |
| | कु. निरंजन विरकर | इ. ९वी ब |
| | कु. गायत्री जाधव | इ. ८वी ब |
| | कु. अभिषेक करंबेळकर | इ. ७वी क |
| **टिळक हाऊस** | कु. सुमेध हाबडे | इ.१०वी अ |
| | कु. मयुर पाटील | इ. ९वी क |
| | कु. आर्या इंगळे | इ. ८वी ब |
| | कु. स्वराली कुलकर्णी | इ. ७वी क |

**इंग्रजी पठण स्पर्धा**

पूर्व-प्राथमिक विभागातील सिनियर के. जी. च्या विद्यार्थ्यांसाठी 'इंग्रजी पठण स्पर्धा' दि. २९ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेसाठी अभ्यासक्रमाबाहेरील कविता हा विषय होता. या स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. परीक्षक म्हणून शिक्षिका सौ. ज्योत्स्ना सुदुंबरेकर यांनी काम पाहिले.

**मराठी वक्तृत्व स्पर्धा**

माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी मराठी वक्तृत्व स्पर्धा दि. ४ सप्टेंबर २०१७ रोजी घेण्यात आल्या. त्याचा निकाल खालीलप्रमाणे :

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. देवेन कालगावकर | इ. १०वी इ | प्रथम |
| कु. धैर्यशील पवार | इ. १०वी इ | द्वितीय |
| कु. अदिती कुलकर्णी | इ. ९वी अ | तृतीय |

**मराठी व इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा**

कनिष्ठ महाविद्यालयाच्या इ. ११वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. १२ सप्टेंबर २०१७ रोजी मराठी व इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रीय मंडळाच्या शिक्षिका सौ. भामिनी नाईक व सौ. माधवी फडके या परीक्षक म्हणून लाभल्या. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कु. साक्षी बोगम | इ. १२वी अ | प्रथम |
| कु. वैष्णवी गुगळे | इ. ११वी ब | द्वितीय |

**हिंदी देशभक्तिपर गीत पाठांतर स्पर्धा**

हिंदी दिनाचे औचित्य साधून इ. ५वी ते ८वी तील विद्यार्थ्यांसाठी दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी देशभक्तिपर हिंदी गीतांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याच निकाल पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कुमारी आर्या देशपांडे | इ. ५वी अ | प्रथम |
| कुमार ऋतुपर्ण रानडे | इ. ६वी ड | द्वितीय |
| कुमारी प्रणिता बापट | इ. ५वी | द्वितीय |

**इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा**

पूर्व-प्राथमिक विभागातील सिनियर के.जी. च्या विद्यार्थ्यांसाठी 'इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा' दि. १५ सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी 'गणेशेत्सव' हा विषय देण्यात आला होता. स्पर्धेस विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतसाद मिळाला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून शाळेच्या सल्लागार सौ. मधुरा काळे व कार्यालयातील सेविका सौ. स्नेहा देसाई यांनी काम पाहिले. शिक्षिका सौ. गायत्री नाईक यांनी स्पर्धा प्रमुख म्हणून काम पाहिले.

**चित्र रंगभरण स्पर्धा**

पूर्व-प्राथमिक विभागातील ज्युनियर के.जी. च्या विद्यार्थ्यांसाठी 'चित्र रंगभरण स्पर्धा' दि. १५ सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित केली होती. स्पर्धेस विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून शाळेच्या माध्यमिक विभागातील चित्रकला शिक्षिका सौ. जयती नरवणे यांनी तर स्पर्धा प्रमुख म्हणून शिक्षिका सौ. जया शेट्टी यांनी काम पाहिले.

**संस्कृत वक्तृत्व स्पर्धा**

माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी दि. १९ सप्टेंबर २०१७ रोजी संस्कृत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कु. सुमंत चोपडे | इ. १०वी इ | प्रथम |
| कु. देवेन कालगावकर | इ. १०वी इ | द्वितीय |
| कु. संजना जोशी | इ. ९वी ब | द्वितीय |

**शिक्षक दिन**

दि. ९ सप्टेंबर २०१७ रोजी शाळेमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. इ. १०वीतील निवडक विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे प्रतिनिधित्व करून अध्यापन केले. शाळेनंतर शिक्षकांसाठी भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**हिंदी दिवस**

माध्यमिक विभागात दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी 'हिंदी दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

माध्यमिक विभागातील विद्यार्थी प्रतिनिधी

कु. प्रियांका कुलकर्णी हिने प्रार्थना, राष्ट्रगीत इत्यादींचे संचालन केले व हिंदी दिनाचे महत्त्व विशद केले. क्रीडा प्रतिनिधी कु. अथर्व कुलकर्णी याने प्रार्थना व सुविचार वाचन केले. सांस्कृतिक प्रतिनिधी कु. तेजस्विनी पवार हिने हिंदीत प्रतिज्ञा म्हटली व सर्व विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला. सांस्कृतिक प्रतिनिधी कु. धैर्यशील पवार याने हिंदीतून समाचार-वाचन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रसिध्द कवींची सुवचने लिहिलेले फलक शाळेत जागोजागी लावण्यात आले होते.

हिंदी दिनाचे औचित्य साधून इ. ५वी ते ८वी तील विद्यार्थ्यांसाठी देशभक्तिपर हिंदी गीतांची स्पर्धा घेण्यात आली.

पुणे महानगरपालिका शिक्षक मंडळ, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय जिम्नॅस्टिक स्पर्धा दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी मुक्तांगण प्रशालेमध्ये पार पडल्या. स्पर्धेचे उद्‌घाटन प्र. प्राचार्या सौ. नूतन बापट व प्र. मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी यांच्या हस्ते झाले. सौ. नूतन बापट यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

**स्वच्छ भारत पंधरवडा**

पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागात दि. १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०१७ हा कालावधी 'स्वच्छ भारत पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात आला.

**शिक्षक प्रशिक्षण वर्ग**

इ. ७वी च्या बदललेल्या आभ्यासक्रमासाठी व प्रश्नपत्रिका रचनेच्या मार्गदर्शनासाठी दि. १ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट २०१७ दरम्यान सिल्व्हर क्रेस्ट, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे येथे पुणे महानगरपालिकेतर्फे विविध विषयांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

इ. ९वी च्या बदललेल्या आभ्यासक्रमासाठी व प्रश्नपत्रिका रचनेच्या मार्गदर्शनासाठी दिनांक ७ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०१७ दरम्यान कै. श्रीकांत भडके प्राथमिक विद्यालय, म.न.पा. शाळा १०५ मार्केटयार्ड, पुणे येथे पुणे महानगरपालिकेतर्फे विविध विषयांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षिका इ. ११वी च्या पुनर्रचित पेपर पॅटर्नसाठी दि. ८, ९ व १८ सप्टेंबर २०१७ रोजी इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टिचर्स, पुणे (IAPT) यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या कार्यशाळेस उपस्थित होत्या.

तसेच सी-डॅक या संस्थेने आयोजित केलेल्या कार्यशाळेला कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षिका डॉ. सौ. मनिषा कोतवाल व सौ. अंजली जोशी या उपस्थित होत्या. ही कार्यशाळा भारती विद्यापीठ इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये दि. १६ सप्टेंबर २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यांच्या कार्यशाळेचा 'Online Labs' हा विषय होता. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ-नाशिक

**संचालक : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सोनिया राजवाडे**

**शिक्षकदिन उत्साहात साजरा**

दि. ४ सप्टेंबर २०१६ रोजी शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी रोटरी क्लबच्या सदस्या सौ. मुग्धा लेले प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे व सौ. भारती पाटील तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीपूजन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप्रज्वलनाने करण्यात आली. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक गौरव गीत सादर केले. शिक्षिका सौ. सोनिया राजवाडे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी सौ. मुग्धा लेले यांनी शिक्षकांना 'टीम वर्क' चे महत्त्व, आवश्यकता व योग्य परिणाम याबद्दल मोलाचे मार्गदर्शन चलचित्रांद्वारे केले.

यानंतर सर्व शिक्षकांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दलची कृतज्ञता गीतातून सादर केली.

यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये माजी विद्यार्थी प्रतिनिधी कु. हर्ष खराटे व कु. साक्षी साळुंके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच याप्रसंगी शिक्षक झालेल्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## हिंदी दिन

दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी हिंदी दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी इ. ९ वी मधील विद्यार्थिनी कु. मृणालिनी चिंचोरे हिने 'हिंदी भाषेचे महत्त्व' सांगितले. तसेच निबंधस्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे विषय १) ग्रंथ हमारे गुरु २) हिंदी भाषा का महत्त्व ३) संत कबीर असे होते. या स्पर्धेचे नियोजन व मार्गदर्शन हिंदी विषय शिक्षिका श्रीमती स्मिता कुलकर्णी यांनी केले.

## 'अवघा महाराष्ट्र फुटबॉलमय' या मोहिमेत सहभाग

जागतिक फुटबॉल वर्ल्डकप या मोहिमेमध्ये या वर्षाचे यजमानपद भारताला मिळालेले असल्याने या वर्ल्डकपचा प्रचार व प्रसार करण्यासाठी व भारतीय टीमला शुभेच्छा देण्यासाठी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी सर्व भारत हा फुटबॉलमय करण्याचे ठरविले आहे. तसेच त्यांनी व महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागाने पुढाकार घेऊन दि. १५ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रात एकाचवेळी फुटबॉल सर्वत्र खेळ्यात आला. याचे ब्रीदवाक्य महाराष्ट्र मिशन १ मिलियन फुटबॉल असे आहे. या आवाहनाला प्रतिसाद देऊन विद्यालय सहभागी झाले. इंटरहाऊस स्पर्धा घेण्यात आल्या. या वेळी फुटबॉलला किक मारुन संचालक डॉ. निहार वाळिंबे व श्री. संजय गुंजाळ यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले व संघाला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे व सौ. भारती पाटील उपस्थित होत्या. सर्व शिक्षकांनी सहभागी होऊन फुटबॉल खेळण्याचा आनंद लुटला.

## नाशिक महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छ भारत अभियान

दि. २२ सप्टेंबर २०१७ रोजी इ. ११ वी वाणिज्य शाखेतील ४० विद्यार्थ्यांची नाशिक महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता अभियानाकरिता निवड करण्यात आली. या प्रंसगी सावरकर नगर म्हसरूळ परिसरामध्ये मा. नगरसेवक व नगरसेविका यांच्या समवेत शिक्षक व विद्यार्थी यांनी सकाळी ९ ते ११ या वेळेत श्रमदान केले.

## शिक्षक पालक सहविचार सभा

उच्च माध्यमिक विभागाची पालक शिक्षक संघाची पहिली सहविचार सभा दि. २३ सप्टेंबर २०१७ रोजी घेण्यात आली. यामध्ये पालक शिक्षक संघाच्या प्रतिनिधींची निवड करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. भारती पाटील यांनी प्रतिनिधींचा सत्कार केला व पालकांशी सुसंवाद साधला.

## क्रीडाविषयक

दि. २७ सप्टेंबर २०१७ रोजी सिकाई मार्शल आर्ट शालेय विभागीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक जिल्ह्यातील खेळाडू सहभागी झाले होते. ही स्पर्धा हिरावाडी येथील मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे घेण्यात आली. या स्पर्धेत इ. १० वी च्या कु. ऋतुजा दिघे, कु. समीक्षा गांगुर्डे व इ. ८ वी च्या कु. विवेक बागुल या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन घवघवीत यश मिळविले. या विद्यार्थ्यांची निवड नागपूर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय सिकाई मार्शल आर्ट स्पर्धेसाठी झाली आहे. याप्रसंगी संचालक डॉ. निहार वाळिंबे व श्री. संजय गुंजाळ, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील व शिक्षकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

***

# माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन (१९७५ - ७६)

पुणे विद्यार्थी गृहाचे, महाराष्ट्र विद्यालय, सदाशिव पेठ येथील दहावी (१९७५ - ७६) च्या बॅचच्या विद्यार्थ्यांचे दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी ८ वे स्नेहसंमेलन पार पडले. श्री. रवींद्र बेलावडे व श्री. संजय रास्ते यांनी दोन महिने आधी विशेष मेहनत घेऊन तयारी केली होती. या संमेलनास ४८ विद्यार्थी उपस्थित होते.

संमेलनास सकाळी १०.३० वाजता मुकुंद व्यायामशाळेशेजारील हॉलमध्ये सुरुवात झाली. संस्थेचे कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे, कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कुलसचिव श्री. सुनील रेडेकर, संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी व श्री. रमेश कुलकर्णी, पर्यवेक्षक श्री. भा. ल. शेलार उपस्थित होते. सर्वप्रथम देशाचे रक्षण करणाऱ्या शहिद जवानांना श्रद्धांजली वाहून संमेलनाची सुरुवात करण्यात आली.

मध्यल्या काळामध्ये कोणी पोलिस अधिकारी, सरकारी उच्चपदस्थ अधिकारी, उद्योजक, प्रोफेसर, व्यावसायिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेले हे विद्यार्थी आपला हुद्दा व वय विसरुन पुन्हा ४० वर्षे मागे, दहावीच्या आठवणीमध्ये रमले होते. त्यांनी जीवनात झगडून या पदापर्यंत कसे पोहचलो? हे सांगून एकमेकांस सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी एकमेकांची टोपण नावे व खोड्या यांची जणू उजळणीच झाली.

कुठलाही मोठेपणाचा व गर्व न बाळगता एकमेकांना आवाज देत, वय विसरुन ४० वर्षांनंतर जुन्या आठवणीमध्ये सर्वजण रमून गेले होते.

त्यानंतर बॅच मधील सरकारी व खाजगी कंपनी मधून निवृत्त झालेल्या १० माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये राष्ट्रपतीपदक विजेते (एसीपी) श्री. अरुण वालतुरे, लेखा अधिकारी श्री. साइंद्र ढवळे, श्री. रवींद्र बडगुजर, श्री. रमाकांत होले, श्री. विजय कोंढारकर, श्री. संजय देशपांडे, श्री. सुरेश भावे, श्री. अशोक शिवले, श्री. गुलाम मखदुम व श्री. शंकर मिगरू यांचा सत्कार संचालकांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच संचालकांचा सत्कार पोलीस अधिक्षक श्री. शंकर केंगार, उद्योजक श्री. राजेंद्र वालतुरे व श्री. रवींद्र बेलावडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

सत्कारानंतर कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे व पर्यवेक्षक श्री. भा. ल. शेलार यांनी संस्थेची माहिती व चालू घडामोडी व भविष्यातील विकास याबद्दल माहिती दिली. कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे यांनी संस्था कशी नावारुपाला आली व संस्था अजून कशी वाढेल, याकडे लक्ष देत आहोत हे सांगितले. आता संस्थेच्या कुठे कुठे शाळा / कॉलेजेस काढली आहेत याबद्दल अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यासाठी प्रा. राजेंद्र कांबळे यांनी संस्थेसाठी माजी विद्यार्थ्यांनी मदत करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन काही विद्यार्थ्यांनी वस्तुरूपाने मदत करण्याचे जाहीर केले.

श्री. वालतुरे व श्री. केंगार साहेब यांनी पोलीस खात्यामध्ये येणारे अनुभव, तपास तसेच गमती जमती सांगितल्या. विद्यार्थ्यांमधून श्री. अरुण वालतुरे यांनी निवृत्तीनंतर आयुष्य समाजासाठीही व्यतीत करावे असा विचार मांडला. श्री. केंगार यांनी आयुष्य आरोग्यदायी जगावे यासाठी सायकलिंग व व्यायाम करावे असे उपायही सांगितले. सर्वश्री ढवळे, बडगुजर, मखदुम, होले, मिरगू, कोंढारकर, देशपांडे, शिवले यांनी सरकारी ऑफिस मधील कामकाज कसे चालते याचे वर्णन केले. श्री. भावे, श्री. कदम, श्री. वालतुरे यांनी कंपनीच्या कामकाजाची माहिती दिली. या प्रकारे अनुभवाची देवाण घेवाण झाली. पुन्हा वारंवार भेटण्याचे अभिवचन देऊन सर्व विद्यार्थी व संचालक मंडळ यांनी सहभोजनाचा आस्वाद घेतला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रमाकांत होले यांनी केले. श्री. शंकर मिरगू यांनी संस्थेने दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानून संमेलनाची सांगता झाली. ज्या विद्यार्थ्यांशी अजूनही संवाद झालेला नाही त्यांनी कृपया श्री. रवींद्र बेलावडे मो. नं. ९४२२०५८३३२ अथवा श्री. संजय रास्ते मो. नं. ९४२२००१८०९ यांचेशी संपर्क साधावा. ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.८.२०१७ ते १५.८.२०१७**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**देणगी रु. १०,००१/- वरील सर्व**

**श्री. माधव शंकर मोघे, ठाणे**
**देणगी रु. २५,०००/-**



सुधाताई मोघे

श्री. माधव शंकर मोघे यांनी दि. ५.८.२०१७ रोजी रु. २५,०००/- ची देणगी कै. सौ. सुधाताई माधवराव मोघे यांचे स्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगीपैकी रु. १०,०००/- चा विनियोग दि. १५.८.२०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला. तसेच रु. १०,०००/- चा विनियोग दि. १४.९.२०१७ अविधवा नवमी या दिवशी आश्रमीय विद्यार्थ्यांना मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला. तसेच रु. ५,०००/- चा विनियोग दि. १४.९.२०१७ रोजी संस्थेच्या पंचवटी नाशिक शाखेतील आश्रमीय विद्यार्थ्यांना संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**श्री. हणमंत गणपती भोसले, पुणे**
**देणगी रु. २५,०००/-**



श्री. हणमंत भोसले

श्री. हणमंत गणपती भोसले यांनी दि. ३.८.२०१७ रोजी रु. २५,०००/- ची देणगी १९६६ बॅच सुवर्ण महोत्सवी स्नेहसंमेलनानिमित्त दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी १२ मे रोजी संस्था वर्धापनदिनी होणाऱ्या खर्चासाठी करण्यात येईल.

**श्रीमती अनुराधा दिलीप मेहेंदळे, ठाणे**
**देणगी रु. १६,०००/-**



अनुराधा मेहेंदळे

श्रीमती अनुराधा दिलिप मेहेंदळे यांनी दि. १.८.२०१७ रोजी रु. १६,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग एका आश्रमीय विद्यार्थ्याचे योगक्षेम खर्चासाठी करण्यात येईल.

**श्री. प्रदीप प्रभाकर घुले, पुणे**
**देणगी रु. १२,०००/-**

श्री. प्रदीप प्रभाकर घुले यांनी दि. १०.८.२०१७ रोजी रु. १२,०००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थी चि. महेश लक्ष्मीकांत पाठक याचे सन २०१७ - १८ या शैक्षणिक वर्षाच्या योगक्षेम खर्चासाठी करण्यात येईल.

**श्री. अनिल मधुकर गोगटे, पुणे**
**देणगी रु. ११,०००/-**

श्री. अनिल मधुकर गोगटे यांनी दि. ७.८.२०१७ रोजी रु. ११,०००/- ची देणगी वडिल कै. मधुकर रामकृष्ण गोगटे यांचे प्रथम वर्षश्राद्धानिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना जिलेबीसह संपूर्ण भोजन देण्यासाठी करण्यात आला.

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

### श्रीमती सुमती मनोहर गाडगीळ, मुंबई
### देणगी रु. ५,५००/-



मनोहर गाडगीळ

श्रीमती सुमती मनोहर गाडगीळ यांनी दि. २.८.२०१७ रोजी रु. ५,५००/- ची देणगी कै. मनोहर यशवंत गाडगीळ यांचे (२२ ऑक्टोबर) जयंतीनिमित्त दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग दि. ७ ऑगस्ट २०१७ रोजी आश्रमीय विद्यार्थ्यांना मोतीचूर लाडू मिष्टान्न देण्यासाठी करण्यात आला.

### श्रीमती विदुला वसंत फाळके, पुणे
### देणगी रु. १०,०००/-

श्रीमती विदुला वसंत फाळके यांनी दि. ४.८.२०१७ रोजी रु. १०,०००/- ची देणगी दिलेली आहे. देणगी रु. ५,०००/- कै. वसंत रामचंद्र फाळके (६ ऑगस्ट), रु. २,५००/- कै. रामचंद्र अमृतराव फाळके (१४ मार्च), उर्वरित देणगी रु. २,५००/- कै. निर्मलाताई रामचंद्र फाळके (१२ मार्च) यांच्या पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे. सदर देणगी व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी स्मृतिदिनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात येईल.

### श्री. मधुकर विश्वनाथ शिदोरे, मा. वि., पुणे
### देणगी रु. १०,०००/-

श्री. मधुकर विश्वनाथ शिदोरे यांनी दि. ४.८.२०१७ रोजी रु. १०,०००/- ची सदिच्छा देणगी दिलेली आहे.

### विश्वस्त श्री कमलेश्वर न्यास, मुंबई
### देणगी रु. ७,५००/-

विश्वस्त श्री कमलेश्वर न्यास यांनी दि. ७.८.२०१७ रोजी रु. ७,५००/- ची देणगी दिलेली आहे. सदर देणगीचा विनियोग ५ गरीब, गरजु, होतकरु, हुशार, सदाचारी आश्रमीय विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १,५००/- प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यासाठी करण्यात आला.

### कु. मिनाक्षी विष्णु केळकर, श्री. मयंक परिमल केळकर, श्री. परिमल गोपाळ केळकर, पुणे
### देणगी रु. ६,०००/-



जानकीबाई केळकर



सुरेश केळकर

